**प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे कोर्टात**
**शरद जी. देशपांडे, न्यायाधीश यांचेसमोर**

**अर्ज (पीजीए) क्र. ५१/२०२२**
(सीएनआर क्र. एमएचएलसी १६०००२८८२०२२)

**:नि.यु–६ वरील आदेश:**
( दिनांक : ०२.११.२०२३ )

१. प्रस्तुत प्रकरण अर्जदाराने कामगार न्यायालयाने सामनेवाले यांचेविरुध्द उपदानापोटी रु. ८३,१०६/– देण्यासाठी केलेल्या आदेशाविरुध्द वसुलीसाठी दाखल केले आहे. प्रस्तुत अर्जात दि.२८.७.२०२२ रोजी आदेश होवून सामनेवाले यांनी सदरच्या आदेशाची पुर्तता केली नाही अथवा सदरच्या आदेशास वरिष्ठ न्यायालयाकडून स्थगन आदेश मिळविला नाही म्हणून अर्जदाराने नाईलाजस्तव हा वसुली अर्ज दाखल केला. ज्याची नोटीस मिळून सामनवाले हजर झाले व त्यांनी म्हणणे दाखल केले परंतु, रक्कम दिली नाही अशा परिस्थितीत संस्थेने मालमत्तेची विक्री केल्यास अर्जदार उपदान रक्कमेची वसुली होईपर्यंत संस्थेच्या मालमत्तेवर सदर निकाला आधारे रु. ८३,१०६/– व्याजासहित मालमत्तेवर बोजा चढवावा म्हणून सदरचा अर्ज दिला आहे.

२. सदरच्या अर्जावर संस्थेचे वकील श्री. पाटील यांनी म्हणणे दाखल केले असून जोरदार आक्षेप घेतला आहे. अशाप्रकारे अधिकार मे.कामगार न्यायालयास नाहीत. तसेच, उपदान कायदयात अशाप्रकारची तरतूद नाही फक्त या प्रकरणात न्यायालयास वसुली प्रमाणपत्र देण्याचे अधिकार असल्याने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळावा असे म्हटले आहे.

३. अर्जदाराचे वकील श्री. गिते व सामनेवाले यांचे वकील श्री. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्जात या न्यायालयाने दि. २८.७.२०२२ रोजी उपदानापोटी ८३,१०६/— रु. दि. १ डिसेंबर २०१७ पासून ९ टक्के व्याजदराने देण्यात यावे असे स्पष्ट आदेश केले आहेत. सामनेवाले संस्थेने सदर आदेशास आव्हान देवून सदर आदेशाविरुध्द स्थगन आदेश मिळविणे क्रमप्राप्त होते अथवा सदर आदेशाविरुध्द अपील दाखल करणे गरजेचे होते. त्यानंतर सदरचा वसुली अर्ज दाखल झाला आहे. अर्जदार हा नोकरीवर नाही व तो वयोवृध्द असून सदर रक्कमेशिवाय त्याला उपजिवीकेचे साधन नाही. अशा परिस्थितीत त्याची रक्कम सामनेवाले संस्थेने लवकर न दिल्याने त्यांच्यावर उपासमारीचे वेळ येणार आहे. हातामध्ये निकाल असून सदर निकालाचा तो उपयोग करुन घेवू शकत नाही. संस्थेचे वकील श्री. पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, वसुली प्रमाणपत्र देण्या व्यतिरिक्त कुठलाही अधिकार या न्यायालयास नाही. माझ्या मते, जर या न्यायालयास वसुली प्रमाणपत्र देण्याचे अधिकार असतील तर निश्‍चितच तदनुषंगिक सदर रक्कम प्राप्त होण्यासाठी योग्य वाटेल ते सर्व अधिकार या न्यायालयास आहेत. अर्जदाराने संस्थेच्या मालमत्तेवर बोजा ठेवण्याची केलेली मागणी रास्त व न्याय असून असे झाल्यास भविष्यात सदरील रक्कमेच्या निकालास वेळ लागला तरी अग्रक्रमाने सदरची रक्कम वसुल करण्यास निश्‍चितच मदत होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून मी खालील आदेश करीत आहे—

:**आदेश** :

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर केला जातो.

२. मा. जिल्हा अधिकारी, अहमदनगर यांनी सामनेवाले श्रीरामपूर दुध, जिल्हा मध्यवर्ती सहकारी दुध व्यावसायीक संघ मर्या. बाभळेश्वर या मालमत्तेवर अर्जदाराच्या नावाची वसुलीबाबत रु. ८३,१०६/—व्याजासहित बोजा निर्माण करावा. या आदेशाच्या पालन एक महिन्याच्या आत करावे व तसा पुर्तता अहवाल या न्यायालयास सादर करावा व याची एक प्रत सामनेवाले यांना देण्यात यावी.

सही/—
(शरद जी. देशपांडे)
न्यायाधीश,
प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर.

दिनांक : २.११.२०२३